# अबोल प्रीत बहरली

सौ. शोभा सतीश राऊत

रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर

A 61

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,

शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

ajabpublications@gmail.com

**अबोल प्रीत बहरली : सौ. शोभा सतीश राऊत**

© **सौ. शोभा सतीश राऊत**

'शब्दांगण' प्लॉट नं.-१७,
जरगनगर, कोल्हापूर.
फोन-०२३१-२६३७७७८, मो. ९९२३८९७८९८

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
riyapublications@gmail.com

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
ajabpublications@gmail.com

**अक्षरजुळणी**
रावजी देसाई

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
जयंत प्रिंटरी

**आवृत्ती**
पहिली आवृत्ती- १९८५, दुसरी आवृत्ती- २००२, तिसरी आवृत्ती- २००६,
चौथी आवृत्ती- २००६, पाचवी आवृत्ती- २०१०,
सहावी आवृत्ती- २०१२, सातवी आवृत्ती- २९ ऑगस्ट, २०१३

**किंमत**
₹ २२०/-

## अर्पणपत्रिका

ही सातवी आवृत्ती-
तमाम साहित्य रसिक- मित्र-मैत्रिनींना...

**- सौ. शोभा सतीश राऊत**

# मनोगत...

'अबोल प्रीत बहरली' ही माझी पहिली-वहिली कादंबरी ! वयाच्या विसाव्या वर्षी लिहिलेली. साहित्य क्षेत्रातील माझे पहिले पाऊल. पहिलं असतं ते अगदी हृदयाजवळचं असतं आणि माझे भाग्य ही कादंबरी रसिकांनाही भावली, आवडली, त्यांनी पत्रांचा वर्षाव केला. फोन केले. मी भारावले... त्यामुळे माझी लेखणीही बहरली, फुलली आणि वाढली देखील; त्यासाठी त्या तमाम रसिकांचे मी मनापासून आभार मानते.

रिया पब्लिकेशन्स्चे श्री. शितल मेहता या कादंबरीच्या सातव्या आवृत्ती सोबत माझ्या इतर आठ कादंबऱ्यांच्या आवृत्तीही प्रकाशित करीत आहेत. माझ्या नऊ कादंबऱ्यांचा पुष्प गुच्छ ते साहित्य रसिकांना देत आहेत. हा माझ्यासाठी 'दुग्धशर्करा' योग आहे. त्यासाठी त्यांना धन्यवाद देते. माझ्या या कादंबऱ्यांच्या गुच्छाचे रसिक मित्र-मैत्रिणी मोठ्या उत्साहाने स्वागत करणार हा विश्वास आहेच, असेच प्रेम राहू देत आणि असेच वाचत राहा... धन्यवाद ! धन्यवाद ! धन्यवाद !

**- सौ. शोभा सतीश राऊत**

# एक

रवीच्या स्कूटरचा आवाज ऐकला आणि सुमतीबाईंनी - त्याच्या आईने सुटकेचा नि:श्वास टाकला. त्याचवेळी अनघा म्हणाली, ''आईग्... रवीदा आला आहे. आता चटकन पानं वाढ आमची. किती भूक लागली आहे ! येऊ दे त्याला आता, ठोकूनच काढते.''

तिचे शेवटचे वाक्य आत येताना रवीने ऐकले, ''अनू, अग कोणाला ठोकून काढणार आहेस ? अं, कॉलेज तर आजपासूनच सुरू झाले आहे, म्हणजे तुझ्या क्रिकेटची प्रॅक्टिस सुरू व्हायला अवकाश आहे.''

त्याला माहीत होते, आज घरी यायला उशीर झाला आहे त्यामुळे अनघा चिडलीय. तिला भूक लागली की काही सुचत नाही, त्यामुळे ती उपवास वगैरेही करीत नाही. पण ही अनू त्याला सोडून, तिच्या रवीदाला सोडून मुळीच जेवत नाही. त्याच्या लाडक्या बहिणीसाठी त्याला वेळेवर घर गाठावे लागत असे. आज बऱ्याच दिवसांनी त्याला शाळेतील मित्र दीपक भेटला होता, आणि बोलण्याच्या ओघात वेळेचे भान राहिले नव्हते. बराच उशीर झाला होता. आता अनूची समजूत घालावी लागणार होती आणि त्यासाठीच त्याने तिचे शेवटचे वाक्य ऐकले असूनही मुद्दाम तिच्या आवडीचा विषय काढला होता.

‘‘बरं का गं आई, आपली अनू ना अशी मस्त क्रिकेट खेळते, अशी एकाएका बॉलला ठोकते. बिच्चारे जीव घेऊन पळत सुटतात. कोणी कितीही लालूच दाखविली तरी थांबायला तयार नसतात. अनूपासून सुरक्षित अंतरावर म्हणजे सीमारेषेच्या बाहेर जाऊनच थांबतात.’’

‘‘रवीदा पुरे ! मला चांगले समजते आहे, माझे एवढे कौतुक का चालले आहे ते. हे बघ, नानासुद्धा आले आहेत. तेव्हा तू चटकन जेवायला ये पाहू.’’

नाना हसून म्हणाले, ‘‘अनू, अगं आज रवीने एवढा उशीर केला आहे, तरीही तू एवढी शांत कशी ?’’

खुर्ची ओढून त्यावर बसत रवी मिष्किलपणे म्हणाला, ‘‘खरंच हो नाना, ह्या नकटीच्या नाकावर खूप राग आहे नाही ?’’ संभाषणात भाग घेत सुमतीबाईही म्हणाल्या, ‘‘अनू, अगं मुलीच्या जातीला एवढा राग चांगला नाही बाई. एवढ्या तेवढ्या कारणावरून तू चटकन तापतेस.’’

खरोखरी अनघाचे डोके तापले. तापणार नाही तर काय ? तिला भयंकर भूक लागलेली, त्यात रवीने उशीर केलेला, आधीच ती कासावीस झालेली, त्यात भरीस भर म्हणजे आई-वडील - भाऊ सर्वांनीच तिला चिडविले होते. आपल्याला राग आलेला आहे, हे कोणाला समजू न देता, ती शांतपणे म्हणाली, ‘‘रवीदा, चल सुरूवात कर. ह्या मटारच्या उसळीच्या वासाने तोंडाला पाणी सुटायला लागले आहे.’’

रवीने आश्चर्याने तिच्याकडे पाहिले, अरे एवढे सर्वांनी चिडवूनही ह्या अनूला अजून राग कसा आला नाही ? वास्तविक आतापर्यंत तिचे फाडफाड बोलणे सुरू व्हायला पाहिजे होते. पण आता मात्र तिला काही एक बोलायला नको, नाहीतर जेवण राहणार अर्धवट. हो ! ह्या अनूचे सारेच काही तऱ्हेवाईक.

अनघाने पहिल्या घासाबरोबर रागही गिळला. ती शांतपणे जेवू लागली, ‘खरंच आपण लगेचच चिडतो. खूप वेळा प्रयत्न केला न चिडण्याचा पण जमतच नाही, कॉलेजमध्ये मैत्रिणीही हेच म्हणतात, ‘अनघा, एवढ्या तेवढ्यावरून किती रागावतेस. तू फाड्फाड् बोलतेस आणि राग शांत झाला म्हणजे डोळ्यात पाणी आणून चार-चार वेळा माफी मागतेस. अगं, आम्हाला तुझा स्वभाव माहीत आहे. पण बाईसाहेब! तुझ्या या वागण्यामुळे ज्याला तुझ्या स्वभावाची कल्पना नाही, त्या व्यक्तीचा खासच गैरसमज होणार,’ अनघाने ठरवले, आता मात्र डोके शांत ठेवण्याचा प्रयत्न करायचा आणि खरोखरी अनघाने हसून बोलायला सुरूवात केली.



‘‘रवीदा, तुला उद्या फर्स्ट पिरीयड आहे का रे ?’’

‘‘हो- आहे तर--’’

‘‘अरे पण उद्या मला फर्स्ट पिरियड नाही, मग मी कशी जाणार कॉलेजला?’’

‘‘धत् त्यात काय मोठे ? माझ्याबरोबर निघ. एक तास लेडीज रूममध्ये काढ. झाले !’’

‘‘ॲहॅरे ! पिरीयड नसतानाही मी घाईगडबडीने निघू ? छट् ! ए रवीदा, उद्याच्या दिवस तू उशिरा जा ना कॉलेजला.’’ सुमतीबाई मध्येच म्हणाल्या, ‘‘अग पण अनू, उद्या तू बसनं जा कॉलेजला.’’

‘‘नारे बाबा ! मला आपलं तू स्कूटरनेच ने.’’ अनघाने हट्ट धरला. समजावणीच्या स्वरात रवी म्हणाला, ‘‘अनू, उद्या कुठल्याही परिस्थितीत मी फर्स्ट पिरीयड अटेंड करणारच. अगं उद्या आपल्या कॉलेजमध्ये नवीन आलेल्या देशमुखसरांचा इंग्लिशचा फर्स्ट पिरीयड आहे. अगं काल ‘बी’ डिव्हिजनवर त्यांचा पिरीयड झाला. त्या मुलांनी ह्या देशमुखसरांना अक्षरश: डोक्यावर घेतले. खूप छान शिकवितात म्हणे. त्यांची पर्सनॅलिटीही एकदम टॉप आहे. खूप आवडले आहेत ते सर सर्वांना. त्यांचं पहिलंच लेक्चर बुडवू? नाही हं, मी मुळीच तुझं ऐकणार नाही. तू बसनंच जा. आय ॲम सॉरी.’’

हे एवढे लेक्चर रवीदाने दिल्यामुळे, तिला पुढे काहीच बोलता येईना. ती मनातून जास्तच वैतागली.

रवी आणि अनघा ही दोघे बहीण-भावंडे एकाच कॉलेजमध्ये होती. रवी बी.ए. च्या फायनल इयरला होता. तर अनघा त्याची पाठची बहीण एस्.वाय्.बी.ए. ला होती. त्याच्यामागे फक्त एकच वर्ष ! तसा रवी अनघापेक्षा दोन वर्षांनी मोठा होता. आठवीच्या परीक्षेआधी तो आजारी पडला. तो ती परीक्षा संपल्यावरच आजारातून उठला. त्याचे एक वर्ष वाया गेले आणि त्यामुळे दोन वर्षे मागे असलेली अनघा एक पायरी पुढे गेली होती.

नाना एक ख्यातनाम डॉक्टर होते. त्यांची फार इच्छा होती रवीला डॉक्टर करण्याची. पण तसे झाले नाही. एस.एस.सी.ला छान मार्कस् मिळवूनही रवीने आर्टस्कडे जाण्याचे ठरविले होते. केव्हा कोण जाणे रवीने ठरविले होते की शिक्षक व्हायचे. शाळेमध्ये नाही, कॉलेजमध्ये प्रोफेसर ! आणि शेवटी नानांनी त्याची आवड पाहून त्याला, त्याच्या इच्छेनुसार वागू दिले. रवीला खूप धीर आला. सतत तो

कॉलेजमध्ये सर्वात पुढे होता. अभ्यासाप्रमाणे खेळातही त्याने नाव गाजविले होते. फायनल - इयरला त्याने प्रिन्सिपल सब्जेक्ट म्हणून इंग्लिशची निवड केली होती.

रवीप्रमाणे अनघाही कॉलेजमध्ये हुशार विद्यार्थिनी म्हणून ओळखली जात असे. अनघा आणि रवीच्या स्वभावात थोडासा फरक होता. नाव रवी असले तरी तो शांत व समजूतदार होता. अनघाचा स्वभावही तसा लाघवी होता. वाईट होता तो तिचा राग ! एखादी गोष्ट तिच्या मनाविरूद्ध झाली की बस्स, ती चटकन चिडायची. तशीच पटकन राग विसरायची देखील. अगदी वळवाच्या पावसासारखी.

✦

रवीने वर्गात प्रवेश केला, आणि वर्गातील गर्दी पाहून त्याला आश्चर्य वाटले. अजून फर्स्ट बेल व्हायची होती, तरी संपूर्ण वर्ग भरला होता. मुलींची साईड तर अगदी खच्चून भरली होती. कॉलेजच्या तीन वर्षात त्याला असा कधी अनुभव आला नव्हता. आज तोसुद्धा नव्हता का लवकर आला होता ? आपल्या लाडक्या अनूसाठीही तो थांबला नव्हता. हे सर्व केवळ नवीन आलेल्या देशमुखसरांसाठीच !

दोन दिवसांतच देशमुखसरांचे नाव सर्वतोमुखी झाले होते. त्यामुळेच त्यांचा आज बी.ए.च्या ‘ए’ डिव्हिजनचा पहिला पिरियड ‘ओव्हरफुल्ल’ झाला होता. किरणने - रवीच्या खास मित्राने रवीसाठी पुढे जागा धरून ठेवली होती. रवी आनंदला. सेकंड बेल झाली, आणि वर्गात एकदम ‘पिनड्रॉप’ सायलेन्स झाला. साऱ्यांच्या नजरा वर्गाच्या दारावर खिळल्या होत्या. सर्वांच्या चेहऱ्यावर उत्सुकता तरळत होती, आणि देशमुख सरांनी वर्गात प्रवेश केला. सर्व मुलामुलींनी उत्स्फूर्तपणे उठून ‘‘गुड मॉर्निंग सर!’’ म्हणून अभिवादन केले.

किंचित मान तिरकी करून हसतमुखाने त्यांनी अभिवादनाचा स्वीकार केला आणि आपल्या खास आवाजात, ते हसून म्हणाले, ‘‘गुड मॉर्निंग एव्हरीबडी.’’

देशमुखसरांच्या उमद्या व्यक्तिमत्त्वाकडे सारा वर्ग भारावून पाहात होता. भरपूर उंची, काळेभोर कुरळे केस, कणखर शरीरयष्टी आणि ह्या सगळ्याला शोभेल असा बुद्धिमत्तेचे तेज झळकणारा भावस्पर्शी चेहरा. छे ! ते मुळी प्रोफेसर वाटतच नव्हते, त्यांच्यातीलच एखादा उमदा विद्यार्थी !

देशमुखसरांनी सर्व वर्गावरून एकदा आपली नजर फिरवली आणि हसतमुखाने इंग्लिशमध्ये बोलायला सुरूवात केली.



‘‘आज या वर्गात माझा पहिलाच पिरीयड आहे. तेव्हा मी प्रथम तुम्हाला माझी ओळख करून देतो. माझे नाव अभिजित देशमुख. नुकताच मी एम्. एड्. फर्स्ट क्लासमध्ये पास झालो, आणि प्रथमच या कॉलेजमध्ये लेक्चरशिप करतोय. महत्त्वाचे म्हणजे ह्याच कॉलेजमध्ये मी विद्यार्थी होतो, तुमच्यासारखा. आज माझी बढती तुमच्या ह्या विद्यार्थी बेंचपासून ह्या स्टेजपर्यंत झाली आहे एवढेच. तेव्हा तुम्ही मला तुमचे फक्त लेक्चरर न समजता मित्र समजावे. तुमचे प्रॉब्लेम्स तुम्ही न संकोचता मला विचारा. असे खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले म्हणजे विद्यार्थी आणि शिक्षक ह्यांच्यातील सुसंवाद टिकविता येईल.’’

विद्यार्थ्यांनी टाळ्यांचा कडकडाट करून आपली पसंती व्यक्त केली. अभिजितच्या त्या सुरूवातीच्या बोलण्याने मुलांवर छाप पडली, विशेषतः मुली तर अगदी भारावून गेल्या होत्या. प्रत्येकजण मनात म्हणत असणार किती छान आहेत नाही हे सर...? ते अनूमॅरिड असतील काय ? आणि नेमका हाच प्रश्न कसा कोण जाणे रवीच्या मनात आला. त्यालाही सर्वांप्रमाणे त्याचे हे नवीन सर फार फार आवडले होते. कधी नव्हे तो त्याच्या मनात विचार चमकून गेला. आपल्या अनूसाठी असा; अगदी अस्साच जोडीदार पाहिजे. किती छान दिसेल त्यांची जोडी.

देशमुखसर प्लॅटफॉर्मवरून खाली आले होते. अगदी रवीच्या पुढेच. मनात घोळणारा हा प्रश्न केव्हा कसा त्याने सरांना विचारला, त्याचे त्यालाच कळले नाही.

‘Are you married sir ?’

हा प्रश्न ऐकताच अभिजतने चमकून त्याच्याकडे पाहिले. त्याला फार आश्चर्य वाटले, भर वर्गात ह्या मुलाने असा प्रश्न करावा ?

रवीला आपला मूर्खपणा लगेचच लक्षात आला. अपराधी स्वरामध्ये रवी कसाबसा म्हणाला, ‘‘सर, मी असे विचारायला नको होते. I am sorry.’

अभिजितला हसू आले. गंमत म्हणून सहज त्याने रवीला प्रश्न केला, ‘‘तुमची कोणी बहीण वगैरे लग्नाची आहे की काय ? तसे असेल तर तुम्हाला प्रयत्न करायला काही हरकत नाही.’’ एक बोट वर करीत अभिजित म्हणाला, ‘‘कारण अजून मी ‘हा’ असा एकटाच आहे.’’

‘‘सर, याची बहीण तुम्ही नक्कीच पसंत करणार. आपल्या कॉलेजची ब्यूटीक्वीन आहे.’’ किरण हलक्या आवाजात म्हणाला. त्यांच्या ह्या संवादावर सारा वर्ग खळखळून हसला.